**अंगणवाडी मदतनीस या रिक्त पदावर नियुक्ती बाबत सर्वसाधारण अटी व शर्ती:-**

बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), जिल्हा सांगली कडील आपल्या नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत अंतर्गत येणा-या खाली नमुद अंगणवाडी केंद्रातील रिक्त मदतनीस या मानधनी पदासाठी त्याच नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत कार्यक्षेत्रातील स्थानिक रहिवाशी असणा-या इच्छुक व पात्र महिला उमेदवारांकडून दि.०७/०२/२०२५ **ते** २१/०२/२०२५ या कालावधीत सुट्टीचे दिवस वगळून सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), जिल्हा सांगली यांचे कार्यालयात अर्ज मागविणेत येत आहेत.

**भरावयाच्या रिक्त पदाचा तपशिल –**

| अ. क्र. | नगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायतीचे नाव | अंगणवाडी केंद्र क्रमांक | रिक्त पदाचे नाव | मानधन रक्कम रुपये | प्रोत्साहन भत्ता | जाहिरात प्रथम/फेर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कडेगाव | ८१ | मदतनीस | ७५०० | रु.८०० ते १००० पर्यंत (नियमांनुसार) | प्रथम |
| २ | कडेगाव | ८५ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| ३ | कडेगाव | ८९ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| ४ | कडेगाव | ९० | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| ५ | कडेगाव | ९१ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| ६ | कडेगाव | ९२ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| ७ | कडेगाव | ९३ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| ८ | कवठेमहांकाळ | ४९ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| ९ | कवठेमहांकाळ | ५० | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| १० | कवठेमहांकाळ | ५१ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| ११ | कवठेमहांकाळ | ५६ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| १२ | कवठेमहांकाळ | ६७ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| १३ | कवठेमहांकाळ | ७० | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| १४ | कवठेमहांकाळ | ७१ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| १५ | खानापूर | ४६ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| १६ | जत | २० | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| १७ | जत | २९ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| १८ | जत | ३१ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| १९ | जत | ३६ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| २० | पलूस | १०६ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| २१ | पलूस | ११२ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| २२ | शिराळा | १३९ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| २३ | शिराळा | १४० | मदतनीस | ७५०० | | प्रथम |
| २४ | शिराळा | १४१ | मदतनीस | ७५०० | | प्रथम |

अटी व शर्ती पुढील पानावर नमुद आहेत.

**<u>अटी व शर्ती -</u>**

१) पात्र व इच्छुक महिला उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज स्वाक्षरीसह परिपुर्ण सादर करणे आवश्यक आहे. (सोबत अर्जाचा नमुना देण्यात आलेला आहे.)

२) अर्जासोबत लहान कुटुंबाबाबत प्रमाणपत्र व प्रतिज्ञापत्र जोडणे अनिवार्य आहे.

३) अर्जासोबत जन्म नोंदीचा दाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, विवाहित असल्यास विवाह नोंदणी दाखला/ विवाह पूर्वीचे व विवाहानंतरच्या नावाची व्यक्ती एकच असलेबाबत दाखला, तसेच खाली दर्शविले प्रमाणे **अ ते ई** पर्यंत आवश्यक प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती सक्षम प्राधिका-याकडून साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे.

**अ)शैक्षणिक पात्रता:-** अंगणवाडी मदतनीस पदासाठी किमान इयत्ता १२ वी उत्तीर्ण (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) आवश्यक.

**ब) वास्तव्याची (स्थानिक रहिवासी असणे) अट**:- अर्जदार त्याच नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत कार्यक्षेत्रातील स्थानिक रहिवाशी उमेदवार असणे आवश्यक.

**क)वयाची अट**:- अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका/अंगणवाडी मदतनीस या पदावर सरळ नियुक्तीसाठी **वयोमर्यादा किमान १८ व कमाल ३५ वर्षे** अशी राहील. तथापि, विधवा उमेदवारांसाठी ही वयोमर्यादा **४० वर्षे** अशी राहील.

**ड)लहान कुटुंब**:- अंगणवाडी मदतनीस या पदासाठी लहान कुटुंबाची (जास्तीत जास्त दोन हयात अपत्ये) अट लागू आहे. अर्जासोबत लहान कुटुंबाबाबत प्रमाणपत्र व प्रतिज्ञापत्र लिहून देणे बंधनकारक आहे.

**इ)भाषेचे ज्ञान:-** भरतीप्रक्रिया राबविण्यात येणा-या अंगणवाडी केंद्रामध्ये ५०% पेक्षा जास्त मुले मराठी भाषा व्यतिरिक्त इतर भाषा (उदा.उर्दू, हिंदी, माडिया, गोड, कोकणी, पावरी, कन्नड, कोरकू, तेलगू, भिल्लोरी, बंजारा इ.पैकी एक भाषा) बोलणारी असतील तर सदर भाषेचे ज्ञान असणा-या (लिहिता व वाचता येणे) उमेदवाराची नियुक्ती करणेत येईल. तथापि, अशा उमेदवाराने इयत्ता १० वी/१२ वी/पदवी/पदव्युत्तर/डी.एड./बी.एड. या शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**ई)विधवा व अनाथ उमेदवारांबाबत तरतूद:-** विधवा उमेदवारांबाबत पतीचा मृत्यु दाखला व स्वयंघोषणापत्र आणि अनाथ उमेदवारांबाबत तसे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर पडताळणीअंती देय गुण देण्यात येतील.

**उ)बदली:-** अंगणवाडी कर्मचारी हे एकाकी पद असल्यामुळे त्यांचे बदलीचे कोणतेही प्रावधान राहणार नाही.

४) प्राप्त अर्जानुसार उमेदवारांची प्राथमिक यादी शैक्षणिक पात्रता,जात व अपत्य बाबत आवश्यक प्रामणपत्राच्या आधारे तयार करून बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), जिल्हा सांगली कार्यालय व संबंधित नगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर शासन निर्णयात नमुद **परिशिष्ट 'ब'** नुसार लावणेत येईल.

५) शिक्षण,वय,प्रवर्ग,अपत्य,विधवा इत्यादी तसेच नोटीस बोर्डावरील यादीतील कोणत्याही उमेदवाराचे प्रमाणपत्र व त्याबदृल दिलेले गुण याबाबत हरकत असल्यास अर्ज केलेल्या उमेदवारांनी, यादी घोषित केल्याच्या दिनांकापासून 10 दिवसांच्या आत बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), जिल्हा सांगली यांचेकडे लेखी तक्रार केल्यास तक्रारीची शहानिशा करुन, शासन निर्णयास अधिन राहून योग्य ती कार्यवाही करणेत येईल. **यानंतर कोणतीही तक्रार आल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.**

६) **गुणवत्ता यादी प्रमाणे प्रथम क्रमांकाच्या उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.**

७) भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्थगित अथवा रद्द करणेचा तसेच पदसंख्येत बदल करणेचा अधिकार बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), जिल्हा सांगली यांनी राखून ठेवलेला आहे.

८) अपात्र ठरविणेत आलेल्या उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविणेत येणार नाही.

९) विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज अपात्र ठरतील.याबाबत पुढील कोणतीही कार्यवाही करणेत येणार नाही.

१०) अर्जदार यांची परिशिष्ट 'ब' नुसार गुणांची प्राथमिक यादी प्रसिध्द करणेची असल्याने उमेदवारांनी **<u>अर्जा सोबत आवश्यक गुणपत्रके/प्रमाणपत्रे यांच्या छायांकित प्रती सक्षम प्राधिका-याकडून साक्षांकित करुन जोडणे अनिवार्य आहे.</u>**

११) **कोणत्याही पदाकरीता एकाही पात्र उमेदवाराकडून अर्ज प्राप्त न झाल्यास किंवा फक्त एकच पात्र उमेदवाराकडून अर्ज प्राप्त झाल्यास फेर जाहिरात देणेत येईल.**

१२) अंगणवाडी मदतनीस पदासाठी शैक्षणिक अर्हतेनुसार व प्राप्त टक्केवारीनुसार गुणांकन करणेचे असलेने अर्ज करणारे उमेदवार यांनी आपले शैक्षणिक अर्हतेनुसार **१२वी,पदवी,पदव्युत्तर,डी.एड.,बी.एड.,MS-CIT/समकक्ष संगणक अभ्यासक्रम** इ.च्या गुणांची टक्केवारी दर्शविणारे गुणपत्रके/प्रमाणपत्र यांच्या **छायांकित प्रती सक्षम प्राधिका-याकडून साक्षांकित करून** अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१३) **खाली नमुद तपशील निहाय आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्यास त्यासाठी गुणदान करणेत येणार नाही.**

१४) **विधवा, अनाथ, जातप्रवर्ग, अनुभव किंवा अन्य निकष यांबद्दल आवश्यक गुण मिळणेकरिता आवश्यक मुळ प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती सक्षम प्राधिका-याकडून साक्षांकित करून जोडणे अनिवार्य आहे.**

१५) भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी राजकीय दबाव आणल्यास संबंधित उमेदवार यांना अपात्र ठरविण्यात येईल.

१६) मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिकांबाबत प्रलंबित न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून सदरची जाहिरात देणेत येत असून भविष्यात कोणत्याही टप्प्यावर मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार जाहिरातीमधील अटी व शर्तीमध्ये बदल अथवा जाहिरात रद्द करणेत येईल.

| अ.क्र. | तपशील | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| ०१ | विहित नमुन्यातील अर्ज | जाहिरातीसोबत नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत स्तरावर उपलब्ध |
| ०२ | लहान कुटुंबाबाबत प्रमाणपत्र | जाहिरातीसोबत नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत स्तरावर उपलब्ध |
| ०३ | आधार कार्ड | आधार कार्डची स्वसाक्षांकित प्रत |
| ०४ | जन्मदिनांक बाबत | जन्म नोंदणीचा दाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र |
| ०५ | अर्जदार विवाहित असल्यास | विवाह नोंदणी दाखला (लग्नापूर्वी व नंतरचे नाव उल्लेख असणारा)/गॅझेट प्रत |
| ०६ | संबंधित नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रातील स्थानिक रहिवासी असलेबाबत रहिवासी दाखला | सक्षम प्राधिकारी यांचा रहिवाशी दाखला/ अधिवास प्रमाणपत्र/स्वयंघोषणापत्र |
| ०७ | इयत्ता १२ वी | गुणपत्रकाची साक्षांकित प्रत |
| ०८ | पदवी | गुणपत्रकाची साक्षांकित प्रत |
| ०९ | पदव्युत्तर | गुणपत्रक/प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत |
| १० | डी.एड. | गुणपत्रक/प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत |
| ११ | बी.एड. | गुणपत्रक/प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत |
| १२ | MS-CIT/समकक्ष संगणक अर्हता | शासकीय मान्यता संस्थेचे संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र |
| १३ | विधवा | पतीचा मृत्यु दाखला व स्वयंघोषणापत्र |
| १४ | अनाथ | मा.विभागीय उपायुक्त ,महिला व बालविकास विभाग यांचे स्वाक्षरीचे अनाथ प्रमाणपत्र |
| १५ | उमेदवाराचे जात/मागास प्रवर्ग प्रामणपत्र (असल्यास) | उमेदवाराचे नावाचा व जातीचा स्पष्ट उल्लेख असलेले सक्षम प्राधिकरणाने दिलेले जातीचे/मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र |
| १६ | अंगणवाडी सेविका/मदतनीस/मिनी अंगणवाडी सेविका म्हणून कमीत कमी २ वर्षांचा अनुभव (असल्यास) | बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांचे स्वाक्षरीचा अनुभवाचा दाखला |

**(अमोल पाटील)**
**बाल विकास प्रकल्प अधिकारी**
**(नागरी), (वर्ग-१)**
**जिल्हा सांगली**

**ठिकाण :- सांगली**

अर्ज सादर करण्याचे ठिकाण-

मा.बाल विकास प्रकल्प अधिकारी,
(नागरी), (वर्ग-१), जिल्हा सांगली यांचे कार्यालय
श्री.खंडोबा मंदीर समोर, जिजामाता हौसिंग सोसायटी,
वारणाली रोड, विश्रामबाग, सांगली-४१६ ४१५.

शासन निर्णय क्रमांक एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६ दिनांक ३० जानेवारी २०२५

**बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी),**
**जिल्हा सांगली यांचे कार्यालय**
**अंगणवाडी मदतनीस या पदासाठी अर्जाचा नमुना**

**फोटो**

**प्रति,**
**मा.बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी),**
**जिल्हा सांगली.**

**विषय:-अंगणवाडी मधील रिक्त मदतनीस पदासाठी अर्ज करीत असलेबाबत**

मी, **बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), जिल्हा सांगली** मार्फत नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत स्तरावर प्रसिध्द करणेत आलेल्या जाहिरातीमधील अटी व शर्ती वाचल्या असून आवश्यक त्या कागदपत्रांसह व माहितीसह अर्ज सादर करीत आहे.

| | |
|---|---|
| **ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नांव** | |
| **ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या स्थानिक क्षेत्राचे नांव** | |
| **अर्जदाराचा भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile no)** | |

**१. अर्जदाराची माहिती**

| | | | |
|---|---|---|---|
| **अर्जदाराचे पुर्ण नांव** | आडनांव | नांव | वडीलांचे /पतीचे नांव |
| | | | |
| **विवाहित असल्यास लग्नापुर्वीचे नांव** | आडनांव | नांव | वडीलांचे नांव |
| | | | |
| **अर्जदाराचा सध्याचा पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ता** | | | |
| **अर्जदार विधवा आहे/नाही** (लागू असेल तिथे ✓ करणे) | आहे ☐ | | नाही ☐ |
| **अर्जदार अनाथ आहे/नाही** (लागू असेल तिथे ✓ करणे) | आहे ☐ | | नाही ☐ |
| **जन्मदिनांक अंकी** | दिनांक | महिना | वर्ष |
| | | | |
| **जन्मदिनांक अक्षरी** | | | |
| **अर्जाची अंतिम दिनांक २१/०२/२०२५ रोजीचे वय** | वर्षे | महिने | दिवस |
| | | | |

| **अर्जदाराची जात प्रवर्ग** (लागू असेल तिथे ✓ करणे) | **अनु. जाती** | **अनु. जमाती** | **इ.मा.व.** | **वि.मा.व.** | **विमुक्त जाती** | **भटक्या जमाती** | **EWS** | **SEBC** | **खुला** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

**२. अर्जदाराची शैक्षणिक पात्रता:-**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | शैक्षणिक अर्हता पूर्ण बोर्ड/विदयापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | एच.एस.सी. | | | | | |
| २. | पदवी | | | | | |
| ३. | पदव्युत्तर पदवी | | | | | |
| ४. | डी.एड. | | | | | |
| ५. | बी.एड. | | | | | |
| ६. | संगणक परिक्षा (MS-CIT/ इतर समकक्ष) | | | | | |

**३. अंगणवाडी सेविका/ मिनी अंगणवाडी सेविका/ मदतनीस म्हणून शासकीय अधिकृत कार्यालयाचा २ वर्षांपेक्षा जास्त अनुभव असल्यास :-**

अ. पुर्वी काम केलेले ठिकाण:- __________

आ. पुर्वी काम केलेला कालावधी :- दि. / / ते दि. / /

इ. एकूण अनुभव :- ______ वर्षे _____महिने

मी अर्जामध्ये नमूद केलेली माहिती व अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे खरी असून सदर माहिती खोटी आढळल्यास मी प्रचलित तरतुदीनुसार होणाऱ्या शिक्षेस व दंडास पात्र असेन. तसेच मला अपात्र ठरविलेस याबाबत माझी कोणतीही तक्रार असणार नाही. त्या बाबत मी तक्रार करणार नाही. तक्रार केलेस माझा अर्ज निकाली काढलेस मी सर्वस्वी जबाबदार असेन. अर्जासोबत जोडलेल्या अटी व शर्ती वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

**दिनांक:-**
**ठिकाण:- सांगली**

**स्वाक्षरी**
**अर्जदाराचे नांव:-**

______________________________

## लहान कुटुंब प्रमाणपत्र

मी.सौ / श्रीमती ______________________________ श्री. ______________________________ यांची मुलगी /पत्नी, वय ________ वर्षे, राहणार मु.पो. ______________________ ता. ______________________ जि.सांगली या प्रतिज्ञापत्राद्वारे जाहीर करत आहे की,

१. मी मदतनीस पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला एकूण ________ खालील प्रमाणे हयात मुले आहेत.

| अ.क्र | मुलाचे/मुलीचे नांव | जन्म दिनांक | वय |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असलेस किंवा भविष्यात दोन पेक्षा अधिक मुले झाल्यास सदर मानधनी पदासाठी मी अनर्ह (अपात्र) ठरविणेत येईल किंवा कमी करण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे. तरी तीन अपत्यांसाठी अपात्र ठरविलेस माझी कोणेतीही तक्रार असणार नाही.

४. मला दोनपेक्षा जास्त मुले होणार नाहीत यासाठी मी कुटुंबनियोजन करुन घेण्याची प्रतिज्ञा करते.

**दिनांक:-**
**ठिकाण:- सांगली**

**स्वाक्षरी**
**अर्जदाराचे नांव:-**

______________________________

अर्जदाराचा
फोटो

# विधवा असल्याबाबत स्वयंघोषणापत्र

मी--------------------------------------------------- श्री.---------------------------------------- यांचा मुलगा /मुलगी वय --------- वर्ष, आधार कार्ड क्रमांक. (असल्यास) ----------------------------------------- व्यवसाय----------------------- राहणार ---------------------------------------------याव्दारे घोषित करतो/ करते की, मी रा.------------------------------------ ता.--------------------------- जि. ---------------------येथील रहिवासी असून माझे पती कै. --------------------------------------------------- हे मयत झालेले असून मी विधवा आहे. तसेच मी आजपर्यंत पुनर्विवाह केलेला नाही.

तसेच मी याव्दारे घोषित करतो/करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजूतीनुसार खरी आहे. सदर महिती खोटी आढळून आल्यास भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्राव्दारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यात येतील,याची मला पुर्ण जाणीव आहे.

ठिकाण:-------------------------------        अर्जदाराची सही:--------------------------

दिनांक: -------------------------------        अर्जदाराचे नाव: -------------------------------------

अर्जदाराचा
फोटो

# रहिवासी स्वयंघोषणापत्र

मी------------------------------------------------- श्री.---------------------------------------- यांचा मुलगा /मुलगी वय --------- वर्ष, आधार कार्ड क्रमांक. (असल्यास) ----------------------------------------- व्यवसाय----------------------- राहणार ---------------------------------------------याव्दारे घोषित करतो/ करते की, मी रा.------------------------------------- ता.--------------------------- जि. ---------------------येथील कायम/तात्पुरते रहिवासी आहे.

तसेच मी याव्दारे घोषित करतो/करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजूतीनुसार खरी आहे. सदर महिती खोटी आढळून आल्यास भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्राव्दारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यात येतील,याची मला पुर्ण जाणीव आहे.

ठिकाण:-------------------------------        अर्जदाराची सही:--------------------------

दिनांक: -------------------------------        अर्जदाराचे नाव: ------------------------------------

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

**विशेष सुचना :- अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे खालील क्रमाने जोडावीत.**

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | सोबत जोडले आहे/नाही | कार्यालयीन वापरासाठी |
|---|---|---|---|
| १. | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र | | |
| २. | शाळा सोडलेला दाखला /जन्म दाखला | | |
| ३. | आधार कार्ड स्वसाक्षांकित प्रत | | |
| ४. | बारावी गुणपत्रक / प्रमाणपत्र | | |
| ५. | पदवी गुणपत्रक / प्रमाणपत्र | | |
| ६. | पदव्युत्तर पदवी गुणपत्रक / प्रमाणपत्र | | |
| ७. | डी.एड. प्रमाणपत्र | | |
| ८. | बी.एड. प्रमाणपत्र | | |
| ९. | संगणक परिक्षा (MS-CIT/समकक्ष) प्रमाणपत्र | | |
| १०. | मागासवर्गीय असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांचा जातीचा दाखला | | |
| ११. | विधवा असल्यास पतीचा मृत्यु दाखला व स्वयंघोषणापत्र | | |
| १२. | अनाथ असल्यास सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र | | |
| १३. | अंगणवाडी सेविका/मिनी सेविका / मदतनीस कामाचा अनुभव दाखला (दोन वर्षे पुर्ण) (असल्यास) | | |
| १४. | सक्षम प्राधिकारी यांचा रहिवाशी दाखला/ अधिवास प्रमाणपत्र/स्वयंघोषणापत्र | | |
| १५. | विवाहित असल्यास विवाह नोंदणी दाखला / नावांत बदलाचे गॅझेट | | |

**दिनांक:-**
**ठिकाण:- सांगली**

मी मदतनीस पदासाठी अर्ज करीत असून अर्जासोबत वरील प्रमाणे कागदपत्रे जोडून मा. बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), जिल्हा सांगली यांचे कार्यालयाकडे सादर करीत आहे.

**स्वाक्षरी**
**अर्जदाराचे नांव:-**

______________________

**स्वाक्षरी:-**
**अर्ज स्विकारणाऱ्याचे नांव :-** ______________
**अर्ज प्राप्त दिनांक:-**